३८

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०१५/प्र.क्र२२/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१५.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकांचा आढावा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत <u>दर महिन्याला घेण्याबाबत...</u>
जिल्हा परिषद/पंचायत समिती, नगर परिषदा/नगर पंचायती व ग्रामपंचायती

महोदय,

आपल्याला माहीतच आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लोकसभा/विधानसभांप्रमाणे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात व्हाव्यात यासाठी भारतीय संविधानामध्ये १९९२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून, प्रत्येक राज्यामध्ये एक स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये १९९४ पासून राज्य निवडणूक आयोग कार्यरत आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या निकालानुसार (प्रामुख्याने सिव्हिल अपिल क्रमांक- ५७५६/२००५, श्री. किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले आदेश व सूचनांची अंमलबजावणी करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे.

२. लोकशाहीचा तिसरा स्तर म्हणून महाराष्ट्र राज्यामध्ये सुमारे २८,००० वेगवेगळया प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका-२६, नगर परिषदा-२३०, नगर पंचायती-१०८, जिल्हा

परिषदा-३४, पंचायत समित्या ३५१, ग्रामपंचायती २७,७८१) कार्यरत असून, ह्या करिता दर ५ वर्षांनी सुमारे ३.०० लाखापेक्षा जास्त लोकप्रतिनिधींना निवडून देण्यात येते.

३. राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे निवडणुकांची सर्व जबाबदारी जिल्हा परिषदा/पंचायत समित्या, नगर परिषदा/नगर पंचायती, ग्रामपंचायतीकरिता जिल्हाधिकारी यांची व महानगरपालिकांकरिता महानगरपालिका आयुक्तांची आहे. (राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १०/२/२०१५ चे आदेश). तसेच संविधानातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

(i) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेची सार्वत्रिक निवडणूक तिची मुदत संपण्यापूर्वी होणे क्रमप्राप्त आहे.

(ii) प्रत्येक नवनिर्मित स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक शक्यतो निर्मितीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत घेणे आवश्यक आहे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिक्त होणारी पदे शक्यतो सहा महिन्यांच्या आत भरणे आवश्यक आहे.

(iv) प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून एका महिन्याच्या आत त्यांच्या निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे क्रमप्राप्त आहे, इत्यादी.

४. असे असूनही या निवडणुकांवर पाहिजे तसे लक्ष स्थानिक अधिकाऱ्यांकडून दिले जात नाही, असे राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आलेले आहे. म्हणून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेशित करीत आहे:-

"विभागीय आयुक्त यांनी "जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मासिक सभेमध्ये" स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपरिषद/नगर पंचायत, जिल्हा परिषद/पंचायत समिती, ग्रामपंचायत) निवडणुकांशी निगडित सर्व बाबींचा रितसर आढावा

घ्यावा व त्याचा अहवाल राज्य निवडणूक आयुक्त यांना दर महिन्याला ३० तारखेपूर्वी सादर करावा." (काही मुद्दे उदाहरणार्थ सोबत जोडले आहेत.)

५. विभागीय आयुक्त यांनी सोबत जोडलेले मुद्दे व इतर मुद्दयांवर संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून दर महिन्याला आढावा घ्यावा व योग्य ती कार्यवाही वेळीच होईल असे पहावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

23/11/2015

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

# मासिक आढावा बैठकीमध्ये घेण्यात येणारे मुद्दे

(१) **सार्वत्रिक निवडणुका-** (जिल्हा परिषद/पंचायत समिती, नगर परिषदा/नगर पंचायती व ग्रामपंचायती करिता वेगवेगळे टेबल तयार करावे.)

पुढच्या एका वर्षात महिनानिहाय मुदत संपणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या व नावे.

(२) **पोटनिवडणुका-**

(i) <u>सदस्यांची कारणनिहाय रिक्त पदे</u>- राजीनामा, मयत, अनर्हता

(ii) <u>सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त पदे</u> - तपशील आणि कारणे. (पद रिक्त झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे आवश्यक आहे.)

(३) **निवडणूक खर्च-**

<u>निवडणूक खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविणे</u> - (निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक आहे.

(४) **जात वैधता प्रमाणपत्र -**

सहा महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांना अनर्ह ठरविणे.

(५) **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे-**

ईव्हीएम व त्यांचा हिशोब व्यवस्थित ठेवणे, Inventory Check

(६) **इन्डेक्स कार्ड/डॉक्युमेन्टेशन**

(७) **मतदार यादीचे अद्ययावतीकरण व बिनचूक करणे-**

भारत निवडणूक आयोगाद्वारे विधानसभा निवडणुकीसाठी तयार केलेली मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरण्यात येते. म्हणून जेव्हा जेव्हा भारत निवडणूकआयोगाकडून मतदार यादीमध्ये Summary Revision करण्यात येते त्या

त्या वेळी जिल्हयामधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता योग्य रितीने प्रसिध्दी देणे व नवीन मतदारांची नोंदणी करणे आवश्यक आहे.

(८) **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी-**

नवीन नवीन कल्पक उपाययोजना राबविणे.

(९) **वर्ष २०१६ व २०१७ मध्ये येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वतयारीचा आढावा**